# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि —४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्रमांक/महा.वि/गो.वि./६६६/२०१६
दिनांक : ९/ ०७/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषयः— सत्र २०१६—१७ या आर्थिक वर्षात पुढील अधिछात्रवृत्ती योजनांचे नवीन मंजुरी व नुतनीकरण अर्ज या संचालनालयास सादर करणेबाबत
१.दक्षिणा अधिछात्रवृत्ती
२.शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती

संदर्भः— १)मा. शिक्षण संचालक, उ. शि. म.रा. पुणे यांचे पत्र क्र. उशिस/१४अई/दक्षिणा व संशो.अधि.छा./२०१६/७८६२, दिनांक १.७.२०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, शिक्षण व सेवायोजन विभाग यांचेकडून शासन निर्णय क्रमांक एससीएच १०६५—यु इि. १९.९.१९६५ अन्वये दक्षिणा अधिछात्रवृत्ती व शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती करिता निर्धारित संच केलेले आहे. त्यानुसार सलंग्नित असलेल्या महाविद्यालयांनी कार्यवाही करून मा. सचांलनालय, उ.शि. पुणे यांना अर्ज पाठविण्यात यावे.

संलग्नितः— वरिलप्रमाणे

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

६९८ ८/६/१६

महाविद्यालय विकास मंडळ
आवक क्र. 2123 दिनांक 21/07/16
आवक क्र. 1560 दिनांक 7/7/16

महाराष्ट्र शासन
संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: Scholarshipavarshan@gmail.co,
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स नं.०२०/२६१२११५३

क्र.उशिसं/१४ अई/दक्षिणा व संशो.अधि.छा./२०१६ / ७८८२ दिनांक 01 JUL 2016

परिपत्रक , कालमर्यादित -

विषय : सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात पुढील अधिछात्रवृत्ती योजनांचे नवीन मंजूरी व नुतनीकरण अर्ज या संचालनालयास सादर करणेबाबत..
१. दक्षिणा अधिछात्रवृत्ती
२. शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 3258 दि. 2/7/16

शिक्षण व सेवायोजन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एससीएच १०६५-यु दि. १९-९-१९६५ अन्वये **दक्षिणा अधिछात्रवृत्ती** करिता शासनाने खलीलप्रमाणे शासकीय महाविद्यालये/ विज्ञान संस्था/अकृषि विद्यापीठ स्तरावर पुढीलप्रमाणे संच निर्धारित केलेले आहेत.

**(१) शासकीय दक्षिणा अधिछात्रवृत्ती**

| | **अ) शासकीय महाविद्यालये व विज्ञान संस्था** | **निर्धारित संच** |
|---|---|---|
| १. | एलिफिस्टन महाविद्यालय, मुंबई | ६ |
| २. | विज्ञान संस्था, मुंबई | ६ |
| ३. | ईस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी, पूर्व, मुंबई | ४ |
| ४. | सिडनहॅम महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई | ४ |
| ५. | शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई | ४ |
| ६. | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ६ |
| ७. | विज्ञान संस्था, नागपूर | ६ |
| ८. | कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | ६ |
| ९. | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ६ |
| १०. | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ६ |
| | **एकूण -** | **५४** |

| | **ब) अकृषि विद्यापीठीय स्तर –** | **निर्धारित संच** |
|---|---|---|
| १. | मुंबई विद्यापीठ, मुंबई | ४ |
| २. | एन एन डी टी महिला विद्यापीठ, मुंबई | २ |
| ३. | पुणे विद्यापीठ, पुणे | ४ |
| ४. | नागपूर विद्यापीठ, नागपूर | ४ |
| ५. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ४ |
| ६. | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |
| | **एकूण -** | **२२** |

डॉ. २१८५ 02/07/16

AR coll

सदर अधिछात्रवृत्ती पदव्युत्तर प्रथम वर्ष नवीन मंजूरी व द्वितीय वर्ष नूतनीकरणास देय आहे.

उपरोक्त अधिछात्रवृत्तीसाठी प्राचार्य, शासकीय महाविद्यालये, संचालक, विज्ञान संस्था व कुलसचिव, अकृषि विद्यापीठ या पुढीलप्रमाणे कालमर्यादित कार्यवाही करावी.

१. शासकीय दक्षिणा अधिछात्रवृत्ती नवीन मंजूरी व नुतनीकरणासाठी दि. १४ ऑगस्ट, २०१६ पर्यंत आवश्यक सर्व कागदपत्रांच्या पुर्ततेसह अर्ज सादर करावेत.
२. शासकीय महाविद्यालये, शासकीय विज्ञान संस्था व अकृषी विद्यापीठे यांनी आपणांस विहीत (निर्धारीत) केलेले संच सर्वच खर्ची पाडतील व एकही संच रिक्त राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.
३. विहीत मुदतीत अर्ज या संचालनालयास प्राप्त न झाल्यास, संबंधीत अधिछात्रांना दक्षिणा अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यांत येणार नाही याबाबतची जबाबदारी संपूर्णतः संबंधीत शासकीय महाविद्यालय/ विज्ञान संस्था/विद्यापीठ यांचीच राहील याची कृपया नोंद घ्यावी
४. नूतनीकरणाचे प्रस्ताव छात्रांचे प्रथम वर्षाची गुणपत्रिका, वार्षिक प्रगती अहवाल व अधिछात्रवृत्तीच्या प्रथम मंजूरी आदेशाची प्रतीसह दिनांक १४ ऑगस्ट २०१६ पर्यन्त सादर करावेत. तदनंतर सादर केलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

## (२) <u>शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती :-</u>

शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन क्रमांक एससीएच-१०८२/४१९९/विशि-३ दिनांक १३-८-१९९५ अन्वये महाविद्यालयीन स्तर शासकीय महाविद्यालये/शासकीय विज्ञान संस्था/राज्यस्तर अकृषि विद्यापीठांकरिता खालीलप्रमाणे संच शासनाने निर्धारित केलेले आहेत. सदर **शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती पीएचडी अभ्यासक्रमांसाठी** प्रथम वर्ष नवीन मंजूरी तसेच द्वितीय व तृतीय वर्ष नूतनीकरणासाठी, शासन निर्णय क्र.:एससीएच २००३/(४०५/०३)/मशि-१ दि. ५ फेब्रुवारी, २००४ मधील दरांप्रमाणे देय आहेत.

**अ) <u>अकृषि विद्यापीठाकरिता संच-</u>** ३

| **ब) <u>शासकीय महाविद्यालयीन स्तर -</u>** | | **<u>निर्धारित संच</u>** |
|---|---|---|
| १. | विज्ञान संस्था, मुंबई | ३ |
| २. | विज्ञान संस्था, नागपूर | ३ |
| ३. | विज्ञान संस्था, औरंगाबाद | ३ |
| ४. | शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती | १ |
| ५. | वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | १ |
| | | ---- |
| | **एकूण संच** | **<u>११</u>** |

उपरोक्त संचासाठी शासकीय प्राचार्य महाविद्यालय प्रमुख व संचालक, विज्ञान संस्था प्रमुख यांनी आपणांस विहीत (निर्धारीत) संचास अधीन राहून पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. शासकीय संस्थेतील संशोधन कार्य करणा-या अधिछात्रांनी अधिछात्रवृत्तीसाठी, विहीत नमुण्यामध्ये व आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेसह आपले अर्ज दि. १४ ऑगस्ट २०१४ पर्यंत संस्थाप्रमुखांकडे सादर करावेत.

२. विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यामधील संशोधन कार्य करणा-या अधिछात्रांनी विहीत नमुन्यामध्ये व आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेसह आपले अर्ज संस्थाप्रमुख / विद्यापीठामार्फत या संचालनालयास दि. २१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत सादर करावेत.

३. विहीत मुदतीत अर्ज या संचालनालयास प्राप्त न झाल्यास, संबंधीत अधिछात्रांना संशोधन अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यांत येणार नाही व याबाबतची जबाबदारी संपूर्णतः संबंधीत शासकीय महाविद्यालय/ विज्ञान संस्था/विद्यापीठ यांचीच राहील याची कृपया नोंद घ्यावी

**नूतनीकरण --**

१. नूतनीकरणाचे प्रस्ताव, छात्रांची गुणपत्रिका, पीएचडी द्वितीय / तृतीय वर्षाचे वार्षिक प्रगती अहवाल प्रथम व द्वितीय वर्षाचे संशोधन विषयक प्रमाणपत्र योग्य त्या प्रपत्रात पाठवावे. तसेच अधिछात्रवृत्तीच्या प्रथम मंजूरी आदेशाची प्रतीसह सदर प्रस्ताव दिनांक २१ ऑगस्ट २०१६ पर्यन्त या संचालनालयास सादर करावेत. तद्नंतर सादर केलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२. नूतनीकरणाच्या रकमा अधिछात्रांना या संचालनालयाकडून मंजूर करण्यांत येतील. त्या सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातच खर्ची पाडणे अत्यावश्यक आहे.

संशोधन अधिछात्रवृत्ती नवीन मंजूरीसाठी विद्यापीठ स्तरावर एकूण मंजूर संच ३ आहेत. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांनी त्यांच्या विद्यापीठात पीएचडी (संशोधनपर) शिक्षण घेणा-या पात्र विद्यार्थ्यांकडून अर्जाची मागणी करुन आवेदनपत्रे, विद्यार्थ्यांच्या संपूर्ण माहिती व महाविद्यालय/विद्यापीठाच्या योग्य त्या शिफारशीसह या संचालनालयास दिनांक २१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत पाठवावेत. तद्नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

उपरोक्त संच निवडीसाठी शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करुन निवड केली जाईल.

उपरोक्त दोन्ही अधिछात्रवृत्तींसाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते उघडणे बंधनकारक असून विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक, बँकेचा संपूर्ण पत्ता, बँक शाखा, शाखा कोड, आय एफ एस सी कोड क्रमांक तसेच बँकेचा एम आय सी आर कोड क्रमांक इत्यादि माहिती बिनचूकपणे अर्जात नमूद करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त दोन्ही अधिछात्रवृत्तीबाबत, शासकीय महाविद्यालये/शासकीय विज्ञान संस्था/अकृषी विद्यापीठे यांनी आपणास विहीत निर्धारित केलेले सर्व संच खर्ची पडतील, एकही संच रिक्त राहू नये याबाबत दक्षता घ्यावी.

**(डॉ.व्ही.आर.मोरे )**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.**

प्रत --

१. संचालक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई / नागपूर / औरंगाबाद
२. सर्व प्राचार्य, शासकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य
३. सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
४. मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण व तंत्र विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.